क्रमांक : १५१५८/ई-१
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई-४०० ०३२
दिनांक : 4 JUN 2018

प्रेषक :

प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

प्रति :

**विधानपरिषदेचे सर्व सन्मा.सदस्य**

विषय : तारांकित स्वीकृत प्रश्नांचे सदस्यनिहाय बॅलटसंदर्भात...
संदर्भ : (१) **या सचिवालयाचे पत्र क्रमांक १३०१५/ई-१, दिनांक ७ मे, २०१८**
(२) **या सचिवालयाचे पत्र क्रमांक १४७९१/ई-१, दिनांक ३० मे, २०१८**

**महोदय/महोदया,**

उपरोक्त पत्राच्या संदर्भ क्रमांक २ च्या अनुषंगाने निदेशानुसार आपणांस कळविण्यात येते की, महाराष्ट्र विधानपरिषदेच्या **बुधवार, दिनांक ४ जुलै, २०१८ रोजीपासून** सुरु होणाऱ्या आगामी अधिवेशनाकरीता गुरुवार, दिनांक १७ मे, २०१८ रोजी पहिल्या टप्प्यात प्राप्त झालेल्या तारांकित स्वीकृत प्रश्नांचे सदस्यनिहाय बॅलट **शुक्रवार, दिनांक ८ जून, २०१८ रोजी ऐवजी सोमवार, दिनांक ११ जून, २०१८ रोजी दुपारी १.०० वाजता मध्यवर्ती सभागृह, पाचवा मजला, विधान भवन, मुंबई** येथे घेण्यात येईल.

गुरुवार, दिनांक १७ मे, २०१८ रोजी पहिल्या टप्प्यात प्राप्त झालेल्या तारांकित प्रश्न सूचनांवरील कार्यवाहीबाबतचा तपशील **सोमवार, दिनांक ११ जून, २०१८** रोजी सकाळी ११.०० ते १२.०० वाजेपर्यंत या सचिवालयातील ई-१ कक्षात (कक्ष क्रमांक १३०४) मा.सदस्यांना अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या त्यांच्या प्रतिनिधींना उपलब्ध करुन देण्यात येईल.

**बॅलटच्या तारखेत झालेल्या बदलाची कृपया नोंद घ्यावी, अशी आपणांस विनंती आहे.**

आपली,

**( पुनम ढगे )**
अवर सचिव
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**याची प्रत माहितीसाठी :**

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये,
विधान भवन, मुंबई-४०० ०३२.

D:\General clerk\SESSION - 2018\MOONSON SESSION-2018\ROTATION ORDER RAINY 2018 (6) Buletin Part 2 - 30-5-2018 reput up.doc